# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


गो.वि./म.वि. वि. वि. / 2914 दिनांक: 25/07/2022

## परिपत्रक

विषय :–महाविद्यालयातील अध्यापकांचे करिअर ॲडव्हान्समेंट स्किम अंतर्गत (कॅस) प्रस्ताव सादर करण्याबाबत

संदर्भ :– मा. सहसंचालक कार्यालय यांचे पत्र क्रमांक उशिनाग/वेतननिश्चिती/शासन प्रतिनिधी/४२६३/२०२२
दिनांक १२/०७/२०२२ च्या अनुषंगाने

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाना कळविण्यात येते कि, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण नागपुर विभाग, नागपुर यांच्याकडुन उपरोक्त संदर्भान्वये विद्यापीठाला पत्र प्राप्त झालेले आहे. सदर पत्रानुसार संलग्नित महाविद्यालयातील अध्यापकांच्या करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) बाबतची प्रकरणे महाविद्यालयांकडुन विनाविलंब निकाली काढण्याबाबत सुचित केलेले आहे..

त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील अध्यापकांचे महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) बाबतच्या प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही घेऊन सदर प्रस्ताव विद्यापीठात सादर करावा. जेणेकरुन विद्यापीठाकडुन नियमानुसार समिती गठीत करण्याबाबतची कार्यवाही घेणे सोईचे होईल. जे महाविद्यालय अध्यापकांच्या प्रलंबित करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) बाबतचे प्रस्ताव विद्यापीठात सादर करणार नाही अशा महाविद्यालयांवर/संस्थेवर विद्यापीठाकडुन तसेच शासनाकडुन कार्यवाही झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेचे अध्यक्ष/सचिव व प्राचार्य यांची राहिल याची नोंद घ्यावी.

सहपत्रः– मा. सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण विभाग, नागपुर यांचे पत्र

मा. प्र–कुलगुरु यांच्या आदेशानुसार

25/07/22

( देवेंद्र एम. झाडे )
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपीः–

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र–कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ........
जावक क्र. 6893 दि. 16/7/22

महाराष्ट्र शासन
सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत परिसर, नागपूर
Website: dirhe.in/jdnagpur/ Email: jdhengp@rediffmail.com
Phone No.0712 2561713 Fax No.0712 2554210

क्रमांकः उशिनाग/वेतननिश्चिती /शासन प्रतिनिधी/8263 /२०२२ दिनांक:- १२.०७.२०२२

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानीत महाविद्यालय
नागपूर/वर्धा/गोंदीया/भंडारा/चंद्रपुर/गडचिरेली
कुलसचिव,
सर्व विद्यापीठ,
नागपूर/रामटेक/गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
आवक क्र. 2723 दिनांक 16/7/22
जावक क्र. ............ दिनांक ............

**विषय :- सहाय्यक प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक/ग्रंथपाल/शा.शिनि. यांचे शासन प्रतिनिधी तसेच स्थाननिश्चितीबाबत.**

**संदर्भः** १. या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ४.०९.२०१९
२. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्रं २२८/१९/विशि-१, मंत्रालय, मुंबई दिनांक ८ जुलै, २०१९
३. संचालनालयाचे पत्र क्रमांक-युएनआय/(७४/२०२०)विशि-१ ५१८४, दिनांक १४ ऑगष्ट २०२०
४. या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक १३.१०.२०२०
५. या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक १२.०४.२०२२

उपरोक्त विषयांकीत तसेच संदर्भिय शासन परिपत्रक, संचालनालयाचे पत्राच्या अनुषंगाने सर्व अकृषी विद्यापीठ तसेच अशासकीय अनुदानीत महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाचे दिनांक १८.०७.२०१८ च्या मार्गदर्शक सुचना शासन निर्णय दिनांक ८.०३.२०१९ व शासन निर्णय दिनांक १०.०५.२०१९ व शासन पत्र दिनांक ८ जुलै, २०१९ नुसार तरतुदी विचारत घेता अध्यापकांची कॅसबाबतची प्रकरणे अर्हता व पात्रता धारक अधिव्याख्यात्यांचे प्रकरण विनाविलंब निकाली काढणे आवश्यक आहे.

यापुर्वी या कार्यालयाचे संदर्भिय परिपत्रकानुसार परिपुर्ण प्रस्ताव विहित विवरणपत्रामध्ये माहिती भरुन सादर करीत नाही. तसेच महाविद्यालयामार्फत सादर होणारे स्थाननिश्चिती लाभाकरीता शासन प्रतिनिधी मागणी करतांना अपुर्ण व नियमास अनुसरुन नसल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.

सबब विषयांकीत प्रस्ताव या कार्यालयामार्फत प्रस्तावित विहीत प्रपत्रात **(प्रपत्र “अ” व प्रपत्र “ब”सोबत संलग्नित केलेले आहे.)** महाविद्यालयाचे प्राचार्यामार्फत प्रचलित शासन निर्णयात नमुद केलेल्या नियम/तरतुदीनुसार प्राचार्य यांचे अधिपत्याखाली महाविद्यालयास समिती नेमूण स्थाननिश्चिती प्रस्ताव शैक्षणिक अर्हता, ए.पी.आय स्कोर **आयक्युऐशी समिती** मार्फत तपासणी रिपोर्ट, उदबोधन/उजाळा/अल्पकालीन वर्ग (शार्ट टर्म कोर्स) याबाबतची छाणनी करुन या कार्यालचे प्रपत्र अ व

ब नुसार परिपुर्ण माहिती व प्रचलित शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या कॅस लाभाकरीता लागु असलेले प्रपत्र भरुन प्रस्ताव या कार्यालयास सादर करावे. वरिल संदर्भिय परिपत्रकान्वये महाविद्यालयास/विद्यापीठास यापुर्वी बरेचदा अवगत करण्यात आले आहे. नोंद घ्यावी.

वरिल प्रसंगी महाविद्यालयामार्फत/विद्यापीठामार्फत स्थाननिश्चिती प्रस्ताव तसेच शासन प्रतिनिधी बाबतची प्रकरणे उशिराने प्राप्त होणार नाही व विहित कालावधीत देय दिनांकास धरुन कॅस बाबत शासन प्रतिनिधीची मागणी महाविद्यालयाकडून करावी. तसेच अधिव्याख्याता यांची सेवानिवृत होणेपुर्वी कार्यवाही करावी अपेक्षीत आहे. सेवानिवृत्ती नंतर तसेच सेवानिवृत्तीच्या अंतीम टप्यात असलेल्या (अधिव्याख्याता संदर्भात कमीत कमी दोन महिने पुर्वी प्रस्ताव सादर करावा. )

वरिल कॅस संबधी शासन प्रतिनिधी बाबतचे प्रस्ताव विहित प्रपत्रात व उचित कागदपत्रासह उपरोक्त प्रस्तावास नमुद केल्याप्रमाणे नियम/तरतुदीनुसार या कार्यालयास सादर न झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी. स्पायरल बाईडींग केलेल्या प्रस्तावाची प्रत प्रस्तावास जोडू नये नोंद घ्यावी. या विषया संदर्भात मार्गदर्शनाकरीता या कार्यालयातील कर्मचा-यांशी संपर्क साधु नये. व विनाकारण या कार्यालयातील कर्मचा-यांचा वेळ घेवू नये. नोंद घ्यावी.

सहपत्र - **या कार्यालयाचे विहित प्रपत्र नमुण अ व ब**

(डॉ. संजय ठाकरे)
सहसंचालक, उच्च शिक्षण
नागपूर विभाग, नागपूर.

## प्रपत्र अ

## कॅस अंतर्गत स्थाननिश्चितीबाबत (प्राध्यापक)

महाविद्यालयाचे नांव:

| अ. क्रं. | प्राध्यापकाचे नाव पदनाम व विषय | शैक्षणिक अर्हता दिनांकासा नमुद करावी | नियुक्ती आदेश व रुजु दिनांक | | विद्यापीठाचे मान्यता आदेश (तदर्थ/नियमीत ) तपशिलासह व त्यानुसार नियमीत झालेला दिनांक | सेवाखंड असल्यास कालावधी एकूण दिवस | सेवाखंड क्षमापित केला असल्यास त्याबाबत विद्यापीठाचे /शासन आदेश | यापुर्वी मिळालेल्या स्थाननिश्चितीचा तपशिल दिनांकासह | सेवाकालावधीत केलेल्या उदबोधन/उजाळा/ अल्पकालावधीचा वर्ग पुर्ण केल्याचा दिनांक कालावधीसह नमुद करावा | एपीआय मार्कस संपूर्ण परिक्षण कालावधीसाठी (वर्षनिहाय) | | | | | प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्यास याचिका क्रमांक/ न्यायालयाचे आदेश नमुद करावे | अपेक्षीत स्थाननिश्चितीदिनांक | प्राचार्यांचे स्पष्ट अभिप्राय स्थाननिश्चितीकरीता शिफारस होय/नाही नसल्यास कारणासह शेरा नमुद करावा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नियुक्ती दि.रुजु दिनांक | सेवा निवत्ती दिनांक | | | | | | वर्ष | (i) | ( ii) | एकूण | ( iii) | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

## प्रपत्र "ब"

## कॅस अंतर्गत स्थाननिश्चितीबाबत (प्राध्यापक)

महाविद्यालयाचे नांव:

| अ. क्रं. | प्राध्यापकाचे नाव पदनाम व विषय | शैक्षणिक अर्हता दिनांकास नमुद करावी | नियुक्ती आदेश, रुजु दिनांक व सेवानिवृत्ती दिनांक (संपूर्ण दिनांकासह) | | विद्यापीठाचे मान्यता आदेश (तदर्थ/नियमीत ) तपशिलासह व त्यानुसार नियमीत झालेला दिनांक | सेवाखंड असल्यास कालावधी एकूण दिवस | सेवाखंड क्षमापित केला असल्यास त्याबाबत विद्यापीठाचे /शासन आदेश | यापुर्वी मिळालेल्या स्थाननिश्चितीचा तपशिल दिनांकासह | सेवाकालावधीत केलेल्या उदबोधन/उजाळा/ अल्पकालावधीचा वर्ग पुर्ण केल्याचा दिनांक कालावधीसह नमुद करावा | एपीआय मार्कस संपूर्ण परिक्षण कालावधीसाठी (वर्षनिहाय) | | | | | अपेक्षीत स्थाननिश्चितीदिनांक | प्राचार्यांचे स्पष्ट अभिप्राय स्थाननिश्चितीकरीता शिफारस होय/नाही नसल्यास कारणासह शेरा नमुद करावा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नियुक्ती दि.रुजु दिनांक | सेवा निवत्ती दिनांक | | | | | | वर्ष | (i) | ( ii) | एकूण | ( iii) | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |

अध्यक्ष स्थानिक महा. व्यवस्थापन समिती　　विषय तज्ञ　　विषय तज्ञ　　कुलगुरु नामनिर्देशित प्रतिनिधी　　शासन प्रतिनिधी　　प्राचार्य